Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

# आदिवासी विकासात शासकिय योजनांचे महत्व

**प्रदिप भगवान नेरकर**
संशोधक विद्यार्थी (पीएच.डी)
डॉ. बा.आं.मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

**प्रा.डॉ. विकास अंकुशराव देशमुख**
सहाय्यक प्राध्यापक (मार्गदर्शक)
भूगोल विभाग, राजर्षी शाहू कला व विज्ञान
महाविद्यालय, वाळूज, औरंगाबाद

## १. प्रस्तावना :-

राज्यातील अनुसूचित जमातीच्या लोकांची संस्कृती व मूल्ये यांचा आदर राखून त्यांना सक्षम बनवून त्यांचा विकास सुनिश्चित करणे, भारतीय संविधानाच्या मार्गदर्शक तत्वानुसार राज्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या लोकांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंबंध जपण्यासाठी विशेष काळजी घेणे आणि त्यांचे सामाजिक अन्याय व इतर पिळवणुकीपासून सरंक्षक करणे त्याअनुषंगाने अनुसूचित जमातीचा शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक सुधारणांच्या कार्यक्रमावर भर देण्यात आला आहे. समाज कल्याण विभागामधून आदिवासी विभागाची निर्मिती सन. १९८३ मध्ये करण्यात आली. आदिवासी जनतेच्या विकासासाठी आदिवासी विभाग विविध योजना महाराष्ट्र राज्यात राबवित आहेत. सदरच्या योजना आदिवासींना वैयक्तिक लाभ देणा-या आणि आदिवासींना सामूहिक तसेच क्षेत्रविकास करण्याकरिता योजना राबविण्यात येतात. जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजने-अंतर्गत राज्यातील विविध प्रशासनिक विभागामार्फत अनेकविध योजना राबविण्यात येतात. त्यांचे मुख्यत्वे ९ विकासशीर्ष आहेत ते पुढीलप्रमाणे-

१)कृषी व संलंग्न सेवा
२) ग्रामीण विकास
३) विशेष क्षेत्रीय कार्यक्रम
४) पाटबंधारे व पुरनियंत्रण
५) विद्युत विकास
६) उद्योग व खनिजे
७) वाहतूक व दळणवळण
८) सामान्य आर्थिक सेवा
९) सामाजिक व सामुहिक सेवा

## २) संशोधनाची उद्दीष्टे :-

१) आदिवासी विकासाची संकल्पना लक्षात घेणे.
२)आदिवासी विकासामार्फत राबविल्या जाणा-या शासकिय योजनांची मुख्य विकासशीर्ष समजून घेणे.
३) आदिवासी योजनाची वैयक्तिक व सामूहिक लाभांच्या योजनांची माहिती मिळविणे.

**३) अभ्यास पध्दती :-**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या अध्ययनासाठी प्राथमिक व दुय्यम स्वरूपाच्या साधनांचा वापर करण्यात आला आहे. यात शासनाच्या योतना, शासननिर्णय, शासन दस्ताऐवज, केंद्रातील आदिवासी योजना व विविध अहवालातून माहितीचे संकलन करून त्यांचे विश्लेषण करण्यात आलेले आहे. तसेच इंटरनेट व संदर्भ पुस्तकांचा वापर करण्यात आलेला आहे.

**४) अभ्यासक्षेत्र :-**

नर्मदा व तापी नद्याच्या प्रवाहाने विखुरलेल्या खानदेशातील नंदुरबार जिल्हा १ जुलै १९९८ साली धुळे जिल्हयाचे विभाजन होऊन अस्तित्वात आला. नंदुरबार जिल्हयातील अक्कलकुवा, अक्राणी, तळोदा, शहादा, नंदुरबार व नवापूर या सहा तालुक्याचा जिल्हा निर्माण झाला. जिल्हयाच्या वायव्येस गुजरात राज्य, ईशान्यस मध्यप्रदेश, व दक्षिणेस धुळे जिल्हा आहे. जिल्हयाचा अक्षवृत्तीय विस्तार- २१००० , उत्तर ते २२०३, उत्तर रेखावृतीय विस्तार- ७३०३१, पूर्व ते ७४०३२, पूर्वच्या दरम्यान आहे. एकूण भौगोलिक क्षेत्रफळ ५०३४.२३ चौरस कि.मी. आहे. सन. २०११ च्या जनगणनेनुसार जिल्हयाची एकूण लोकसंख्या १६,४६,१७७ असून ६७ टक्के लोकसंख्या आदिवासी जमातीची आहे.

**❖ आदिवासी विकासाची संकल्पना :-**

भारताच्या राज्यघटनेत आदिवासी समाजाच्या हितासंबंधीची जोपासना करण्यासाठी व त्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी काही मुलभूत तुरतूदी घटनेत नमुद करण्यात आल्या आहेत. घटनाकारांनी भारतातील सामाजिक व आर्थिक परिस्थिती लक्षात घेवून अनुसूचित जमातींना देशाच्या स्वांतत्र्योत्तर काळातील विकासात न्याय स्थान मिळावे त्यांचा सर्वार्थाने विकास व्हावा व सामाजिक आणि आर्थिक समता प्रस्थापित व्हावी मागासलेल्या जमातीमध्ये उपेक्षितांची भावना राहू नये या सर्व बाबींचा विचार करून देशाच्या मूळ घटनेत जाणीवपूर्वक अनेक तरतूदी केल्या आहेत.

आदिवसी विकास म्हणजे नेमके काय ? असा प्रश्न निर्माण होणे साहजिकच आहे. विकासाची संकल्पना व्यक्तीगत आणि सामुहिक हिताशी जोडली गेलेली आहे. आदिवसी समाजाच्या काही मुलभूत समस्या आहेत. ते म्हणजे रस्ते, वीज, पाणी, दळण-वळण साधने, आरोग्याच्या सुविधांचा अभाव, दारिद्रय, निरक्षरता रूढ-परंपराचा पगडा, कुपोषण इत्यादी समस्यांमुळे आदिवसी समाज मागासलेला राहिला आहे. विकासाच्या मूळ प्रवाहात पोहोचू शकला नाही. भारताच्या माजी पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी यांनी आदिवसीच्या विकासासाठी आदिवसी उपयोजनांची संकल्पना सर्व प्रथम मांडली त्यामुळे संपूर्ण देशभर आदिवसी विकासाची कार्य सुरू झाले.

आदिवसी विकास म्हणजे आदिवसी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनाने हाती घेतलेल्या उपाययोजना होय की, ज्यामुळे त्यांचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व अन्य सर्व क्षेत्रांचा कायापालट होऊ शकतो. आदिवासी विकासाची संकल्पना वैयक्तिक व सामुहिक हितात दडलेली आहे. आदिवसी क्षेत्रात पायाभूत सुविधा पुरवून आदिवासींना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे. तसेच आदिवसी

क्षेत्राचा आणि आदिवसी समाजाचा वेगाने नियोजनबध्द विकास करणे ज्यामुळे सामाजिक असमतोल दूर होईल ही विकासाची संकल्पना आहे. विकास ही संकल्पना अनेक अंगाने वापरली जाते त्यामध्ये आर्थिक, सामाजिक, राजकिय, सांस्कृतिक विकास असा ही भाग समाविष्ट असू शकतो मात्र आदिवसींचा विकास या संकल्पनेत त्यांचा आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक विकास अपेक्षित आहे.

आर्थिक विकास ही संकल्पना भौतिकवादी विकासापासून कल्याणकारी विकासापर्यंत होत गेली. आलीकडच्या काळात शाश्वत विकास या संकल्पनेचा उदय झाला असून त्यांचे मूळ पर्यावरण समतोल आणि समन्वायी विकासामध्ये आहे.

आदिवासी विकासासाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पामार्फत विविध योजना राबविल्या जात आहेत. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पामध्ये काही व्यक्तीगत लाभाच्या योजना आहेत. तर काही सामुहिक लाभाच्या आहेत. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेमार्फत राबविल्या जाणा-या योजना विविध स्वरूपाच्या आहेत.

महाराष्ट्रातील आदिवासी विकासासाठी आदिवासी उपयोजना क्षेत्रातील तरतूद व खर्च याबाबतच ही चित्र आशादायी आहे. योजना तयार करतांना योजनांचे स्वरूप, उद्दिष्टे व योजनांचा लाभ मिळविण्यासाठी आवश्यक अटी घालून दिलेल्या आहेत. अटीची पूर्तता करणा-या आदिवासींना संबधीत योजनेचा लाभ द्यावा ही तरतूद आहे. विशेष म्हणजे मागणी केलेल्या व नियंत्रणामध्ये बसून पात्र ठरलेल्या लाभार्थ्यास लाभ मिळतोच असे नाही कारण अनुदानाची रक्कम व लाभार्थ्यांची संख्या निश्चित केली जाते. त्या आर्थिक वर्षात लाभार्थी आणि अर्थसहाय्य करावयाच्या रक्कमेचे लक्ष पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जातो. याचा अर्थ असा आहे की, प्रत्येक आदिवासींना योजनेचा लाभ होईल असे नाही. तर योजनेच्या तरतुदीतील लाभार्थ्यांना योजनेचा लाभ होत असतो.

### ५) आदिवासी विकास योजनांचा परिचय :-

महाराष्ट्रातील दुर्गम व डोंगराळ भागातील आदिवासींच्या कल्याणासाठी सन. १९८३ पासून स्वंतत्र आदिवासी विकास विभागाची निर्मिती झाली. आदिवासींची सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकास व्हावा यासाठी या विभागामार्फत विविध योजना राबविण्यात येतात त्या योजनांचा परिचय सारणी क्र. १ मध्ये केलेला आहे.

**सारणी क्र. १**

**राज्यातील आदिवासी विकासाच्या विविध योजना**

| अ.क्र. | योजना | योजनांची संख्या | एकूण योजना संख्या |
|---|---|---|---|
| १. | **कृषी व संलग्न सेवा** | - | १३० |
| | (अ) पीक संवर्धन | १९ | - |
| | (ब) फलोत्पादन | ०८ | - |
| | (क) मृदा व जलसंधारण | ०४ | - |
| | (ड) पशुसंवर्धन | २४ | - |

| | | | |
|---|---|---|---|
| | (इ) दुग्धव्यवसाय | १३ | - |
| | (ई) मस्त्य व्यवसाय | ०९ | - |
| | (उ) वने | १६ | - |
| | (ऊ) सामाजिक वनीकरण | ०७ | - |
| | (ए) पणन भांडारे व वखारी | ०२ | - |
| | (ऐ) सहकार | २८ | - |
| २. | **ग्रामीण विकास** | | १३७ |
| | (अ) रोजगार | ०४ | |
| | (ब) जमीन सुधारणा | ०२ | |
| | (क) सामुहिक विकास | ०१ | |
| ३. | **विशेष क्षेत्रीय कार्यक्रम** | - | १३९ |
| | (अ) आर्दश गांव | ०२ | - |
| ४. | **पाटबंधारे व पूरनियंत्रण** | - | १४३ |
| | (अ) सहकार | ०१ | - |
| | (ब) पूरनियंत्रण | ०३ | - |
| ५. | **विद्युत विकास** | - | १५० |
| | (अ) ऊर्जा विकास | ०७ | - |
| ६. | **उद्योग व खनिजे** | - | १६४ |
| | (अ) ग्रामीण लघुउद्योग | ०८ | - |
| | (ब) ग्रामीण लघुउद्योग (शिक्षण) | ०२ | - |
| | (क) ग्रामीण लघुउद्योग (सहकार) | ०४ | - |
| ७. | **रस्ते विकास** | - | १७९ |
| | (अ) रस्ते आणि पुल | १४ | - |
| | (ब) अंतर्गत जलवाहतूक | ०१ | - |
| ८. | **सामान्य आर्थिक सेवा** | - | १८१ |
| | (अ) स्थानिक विकास (पर्यटन) | ०२ | - |
| ९. | **सामाजिक व सामुहिक सेवा** | - | २८२ |
| | अ) प्राथमिक शिक्षण | ३३ | - |
| | ब) माध्यमिक शिक्षण | १० | - |
| | क) इतर शैक्षणिक कार्यक्रम | ०६ | - |
| | ड) जिल्हा प्राथमिक प्रकल्प | ०१ | - |
| | ई) तांत्रिक शिक्षण | ०९ | - |
| | फ) क्रीडा व युवक कल्याण | १२ | - |
| | ग) कला संस्कृती | ०१ | - |
| | ह) सार्वजनिक आरोग्य | २६ | - |
| | य) सार्वजनिक आरोग्य अनुशेष | ०३ | - |

| | | | |
|---|---|---|---|
| १०. | **पाणीपुरवठा** | - | २९१ |
| | अ) ग्रामीण पाणीपुरवठा | ०७ | - |
| | ब)जल नि:सारण | ०२ | - |
| ११. | **गृहनिर्माण** | - | २९८ |
| | अ) गृहनिर्माण (जिल्हा योजना) | ०७ | - |
| १२. | **नगरविकास** | - | ३०१ |
| | अ) नगर विकास (जिल्हायोजना) | ०३ | - |
| १३. | **मागासवर्गीय कल्याण** | - | ३६३ |
| | अ) आदिवासीचें कल्याण | ०४ | - |
| | ब) शिक्षण | ०८ | - |
| | क) आर्थिक उन्नती | ०४ | - |
| | ड) इतर योजना | ०६ | - |
| | ई) समाज कल्याण | ०६ | - |
| | फ) महिला व बालकल्याण | ०२ | - |
| | ग) कामगार कल्याण | ३२ | - |

स्त्रोत- आदिवासी संशोधन पत्रिका : मार्च २०१० पृष्ठ क्र. ५३ व ५४, महाराष्ट्र राज्य, पुणे.

महाराष्ट्र राज्यात आदिवासींच्या विकासासाठी विविध शासकिय योजना विविध विभागामार्फत राबविण्यात येतात. ३६३ योजना आदिवासी उपाययोजना क्षेत्रात राबविल्या दिसून येतात. आदिवासी समाजातील लोकांचे आर्थिक उन्नतीसाठी या योजना राबविल्या जातात आदिवासी उपाययोजना क्षेत्रात विविध शसकिय योजना राबवून त्यांना सक्षम करणे हे शासनाचे ध्येय आहे.

### ६) शासकिय योजना व त्यांच्या अटी :-

शासकिय योजना राबवितांना सर्वसाधारणपणे काही अटी व शर्ती देण्यात येतात.

१)लाभार्थी हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

२) लाभार्थ्याकडे जातीचा दाखला असावा.

३) काही योजनांच्या संदर्भात लाभार्थीचे उत्पन्न हे दारिद्रय रेषेखाली असावे.

४) लाभार्थ्यांने यापुर्वी कोणत्याही योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

५) योजनांच्या अनुषंघाने लाभार्थीकडे बॅक अकाऊट व आधारकार्ड असणे अनिवार्य आहे.

आदिवासी बांधवांच्या विकासासाठी शासनामार्फत अनेक योजना राबविण्यात येतात. आदिवासी समाजासाठी राज्यात स्वतंत्र विभाग आज कार्यरत आहे. आदिवासी शेत जमीन सरंक्षण कायदा, आदिवासी महामंडळाची निर्मिती, एकाधिकार खरेदी, आदिवासी विकासासाठी वेगळे बजेट, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ, शिक्षण, शिष्यवृत्ती, निवारा, वस्तीसुधार, खावटी कर्ज, रोजगार व स्वंयरोजगार अशा विविध योजना आदिवासी समाजासाठी राबविण्यात येतात.

**१)रोजगार व स्वयंरोजगार :-**

अनुसूचित जमातीच्या युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी या उद्देशाने राज्यात परिवहन महामंडळ व राज्य शासनाच्या संयुक्त मोटर वाहन प्रशिक्षण देण्यासाठी पांढरकवडा व गडचिरोली येथे प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आले आहे.

शारीरिक व शैक्षणिक दृष्टया योग्य असणा-या आदिवासी तरूण-तरूणीनां त्यांच्या कुटुंबाची आर्थिक व सामाजिक प्रगती होईल व त्यांचे जीवनमान उंचावेल म्हणून सैन्यदल किंवा पोलिस दलात भरती होण्यासाठी भरतीपूर्वी प्रशिक्षण देण्यात येत आहे.

**२) निवारा :-**

कुडा मातीच्या घरात झोपडयामध्ये किंवा तात्पुरत्या तयार केलेल्या निवा-यात राहतात. अशा आदिवासींना कायमस्वरूपी हक्कांचे घर मिळावे शहरी आदिवासी घरकुल योजना राबविण्यात येते.

**३) आरोग्य :-**

आदिवासींच्या आरोग्य विषयक समस्याबाबत संवेदन शिलतेचा विचार करून दुर्गम भागात वैद्याकिय सेवा वेळेवर उपलब्ध होण्याकरिता पोष्टीक आहाराचा पुरवठा व इतर आरोग्य सेवा संदर्भात अनेक समस्यांना सातत्याने तोंड द्यावे लागत असल्याने विशेषता उन्हाळा व पावसाळयात उद्भवणा-या समस्यांना तोंड देण्यासाठी विशेष कृती कार्यक्रम नवसंजीवन योजना या नावाने राबविण्यात येते.

**४) उच्चशिक्षण :-**

आदिवासी मुला-मुलीकरीता शासकिय वसतीगृहे, अनुसूचित जमातीच्या मुला-मुलींना उच्च शिक्षणाची सोय व्हावी व त्यांची शैक्षणिक उन्नती व्हावी या उद्देशाने ही योजना सुरू करण्यात आली आहे. शासकीय वस्तीगृहात गुणवत्तेनुसार प्रवेश देवून त्यांना निवारा भोजन, आथरून, पांघरून, पुस्तके, शैक्षणिक व इतर आवश्यक साहित्य पुरविले जाते.

**५) खावटी कर्ज याोजना :-**

आदिवासिना कर्ज मिळणे सुलभ व्हावे यासाठी खावटी कर्ज योजना राबविण्यात येते ही योजना राबविण्यात आदिवासी विकास महामंडळ नेमण्यात आलेले आहे.

**६) फलोत्पादन :-**

फलोत्पादन , रोप संरक्षण व बागायती रोप मंडळाची स्थापना बळकटीकरण या कार्यक्रमाव्दारे लहान व सिमांकित आदिवासीना या योजनेव्दारे १००% अनुदान देण्यात येते.

**७) शेतक-यांना विजपंप :-**

आदिवासी शेतक-यांना १००% अनुदानावर विजपंप तेलपंप पुरविण्यात शासनाची योजना राबविण्यात येते.

**८) आदिवासी हस्तकला शिक्षण :-**

आदिवासीनी तयार केलेल्या वस्तु नागरि भागात प्रदर्शित करुन त्यांच्या विक्रीव्दारे या कलाकरांना स्वयंमरोजगारसाठी संधी उपलब्ध करून देणे अशा प्रकारे अनुसूचित जमातीचा विकास, विभागामार्फत शिक्षण, उच्चशिक्षण प्रशिक्षण वस्तीसुधार, शेतीपुरक उपक्रम अशा वैयक्तिक व सामुहिक लाभाच्या

अनेकविध योजना राबविण्यात येतात म्हणजेच शासनाकडून राबविल्या जाणा-या योजनांमधुन कोणताही आदिवासी समाज या लाभापासुन वंचीत राहणार नाही याची शासनाकडून काळजी घेतली जाते.

श्री. द. म. सुथनकर समितीने अशी शिफारस केली आहे की आदिवासी उपयोजनेच्या व्ययाचा मोठा भाग आदिवासींना प्रत्यक्ष लाभ देणा-या योजना, मृदासंधारण आणि जलसंधारण, ग्रामीण पाणपुरवठा, जोडरस्ते, माता व बाल आरोग्य इत्यादी योजनांना प्राधान्याने निधी उपलब्ध करून देणे असे त्यांनी म्हटले आहे. आदिवासी उपयोजनेचे पुनर्विलोकन करता असे दिसू आले की, जिल्हानियोजन विकास समित्यांना आदिवासींशी निगडित कुपोषण, आरोग्य, शैक्षणिक मागासलेपण, बेरोजगारी या समस्या करीता पुरेसा व्यय उपलब्ध करून देण्यास काही मर्यादा येत होत्या हाच निष्कर्ष राज्य नियोजन मंडळाचे सदस्य डॉ. जयंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या समितीने काढलेल्या आहे. असे असले तरी शासन मोठया प्रमाणावर आदिवासी विकास योजना राबवून आदिवासी विकासाचे ध्येय गाठत आहे.

**सारणी क्र. २**

**नंदुरबार जिल्हयातील आदिवासी कुटुंबांना शासकिय योजनेतून मिळालेल्या लाभाची माहितीची उपयुक्तता दर्शविणारा सारणी**

| अ.क्र. | उत्तरदात्या आदिवासी माहिलांची माहिती | प्रतिसादांची संख्या | प्रतिसादाची टक्केवारी |
|---|---|---|---|
| २.१. | आदिवासी शासकिय योजनांची तुम्हाला माहिती मिळते का ? | | |
| | अ) होय | ४६३ | ८५.७४% |
| | ब) नाही | ६० | ११.११% |
| | क) सांगता येत नाही एकूण उत्तरदात्या आदिवासी महिलांची संख्या | १७ ५४० | ३.१४%<br>१००% |
| २.२. | आदिवासी शासकिय योजनांची माहितीचा मुख्य स्त्रोत कोणता ? | | |
| | अ)मित्र/परिवार/नातेवाईक | ९८ | १८.१४% |
| | ब) सरपंच | १४७ | २७.२२% |
| | क) सामाजिक कार्यकर्ते | १३६ | २५.१८% |
| | ड) योजना राबविणारे (विकास अधिकारी) | १२० | २२.२२% |
| | इ) संपर्क साधने एकूण उत्तरदात्या आदिवासी महिलांची संख्या | ३९<br>५४०% | ७.२२%<br>१००% |

स्त्रोत माहिती संग्रह व विश्लेषण

सारणी क्र.२ वरून स्पष्ट होते की प्र. २.१ आदिवासी शासकिय योजनांची तुम्हाला माहिती मिळते का? असे विचारले असता संशोधन विषयासाठी निवड केलेल्या ५४० नमुना महिला आदिवासी उत्तरदात्याकडून मुलाखत अनुसूचीच्या माध्यमातून तथ्य संकलन करतांना ८५.७४ टक्के उत्तरदात्या

Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

आदिवासी महिलांनी होय असे सांगितले. तर ११.११ टक्के उत्तरदात्या आदिवासी महिलांनी योजनांची माहिती मिळत नाही असे सांगितले तर ३.१४ टक्के उत्तरदात्या आदिवासी महिलांनी योजनांची माहिती विषयी आपले मत सांगता येत नाही असे सांगून असमर्थता दर्शविलेली आहे.

प्र. २.२. आदिवासी शासकिय योजनांची माहितीचा मुख्य स्त्रोत कोणता आहे? असे विचारले असता संशोधन विषयासाठी निवड केलेल्या ५४० आदिवासी महिलां पैकी १८.१४ टक्के महिलांनी मित्र, परिवार, नातेवाईकाकडून माहिती मिळाल्याचे सांगितले. २७.२२ टक्के उत्तरदात्या महिलांनी सरपंचाकडून माहिती मिळाल्याचे सांगितले आहे. २५.१८ टक्के उत्तरदात्या महिलांनी सामाजिक कार्यकत्याकडून माहिती मिळाल्याचे सांगितले आहे. तर २२.१८ टक्के उत्तरदात्या महिलांनी विकास अधिका-यांकडून माहिती मिळाल्याचे सांगितले आहे. तर ७.२२ टक्के उत्तरदात्या आदिवासी महिलांनी संपर्क साधनाव्दारे माहिती मिळाल्याचे सांगितले आहे.

सारणी क्र.३

**आदिवासी योजनांचा लाभ व अडचणी विषयक माहिती दर्शविणारा तक्ता**

| **अ.क्र.** | **उत्तरदात्या आदिवासी माहिलांची माहिती** | **प्रतिसादांची संख्या** | **प्रतिसादाची टक्केवारी** |
|---|---|---|---|
| ३.१. | आदिवासी योजनांचा तुम्हाला लाभ होतो का ? | | |
| | अ) होय | ४८७ | ९०.१८% |
| | ब) नाही एकूण उत्तरदात्या आदिवासी महिलांची संख्या | ५३<br>५४० | ९.८१%<br>१००% |
| ३.२. | आपणाला कोणत्या योजना लाभाच्या वाटतात | | |
| | १) वैयक्तिक लाभांच्या योजना | ४४४ | ८२.२२% |
| | २) सामुहिक लाभांच्या योजना एकूण उत्तरदात्या आदिवासी महिलांची संख्या | ९६<br>५४० | १७.७७%<br>१००% |
| ३.३. | शासकिय योजना मिळवितांना अडचणी येतात का ? | | |
| | अ) होय | ३२६ | ६०.३७% |
| | ब) नाही एकूण उत्तरदात्या आदिवासी महिलांची संख्या | २१४<br>५४० | ३९.६२%<br>१००% |

स्त्रोत : माहिती संग्रह व विश्लेषण

सारणी क्र. ३ वरून स्पष्ट होते की, प्र. ३.१. आदिवासी योजनांचा तुम्हाला लाभ होतो का? ९०.१८ टक्के आदिवासी महिलांनी होय सांगितले आहे. तर ९.८१ टक्के आदिवासी महिलांनी नाही सांगितले आहे. प्र.३.२. आपणाला कोणत्या योजना लाभांच्या वाटतात? असे विचारले असता उत्तरदात्या महिलां पैकी ८२.२२ टक्के आदिवासी महिलांनी वैयक्तिक लाभाच्या योजना महत्वाच्या आहेत. असे म्हटले आहे तर १७.२२ टक्के उत्तरदात्या आदिवासी महिलांनी सामुहिक लाभाच्या योजना महत्वाच्या आहेत असे म्हटले आहे.

प्र.३.३. शासकिय योजना मिळवितांना अडचणी येतात का ? असे विचारले असता उत्तरदात्या महिलांपैकी ६०.३७ टक्के महिलांनी योजना मिळवितांना अडचणी येतात असे सांगितले आहे. ३९.६२ टक्के उत्तरदात्या आदिवासी महिलांनी योजना मिळवितांना अडचणी येत नाही असे सांगितले आहे.

## ९) निष्कर्ष :-

१)केंद्र व राज्यस्तरावरून आदिवासी विकासासाठी बहुविध योजनांची अंमलबजावणी केलेल्या आहेत. योजनासाठी शासन आर्थिक तरतूदी केलेल्या आहेत.
२) बहुतांश आदिवासी विकासाच्या योजना या वैयक्तिक किंवा सामुहिक लाभांच्या योजना आहे. योजनेच्या माध्यमांतून आदिवासी क्षेत्रात पायाभूत सुविधा निर्माण व्हाव्यात आदिवासी समाज विकासाच्या मुख्य प्रवाहात यावा ही शासनांची भुमिका आहे.
३) आदिवासी शासकिय योजनांचे मुख्यत्वे नऊ विकासशीर्ष आहेत. यातील रोजगार, आहार, निवारा व शिक्षण व सांस्कृतिक मुल्यांना पाठबळ देवून आदिवासी समाजाचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला जात आहे.

## १०) संदर्भग्रंथ

१) डॉ. इंद्रजित जाधव (२०१३) : आदिवासी विकास आणि योजना, संजय प्रकाशन, पुणे.
२) डॉ. कांतीलाल टाटीया (२००३) : आदिवासींच्या विकास योजना, मुग्धा प्रकाशन, शहादा.
३) डॉ. शौनक कुलकर्णी (२००९) : महाराष्ट्रातील आदिवासी, डायमंड प्रब्लिकेशन्स, पुणे.
४) विभागाच्या योजनांची माहिती पुस्तिका : आदिवासी विकास विभाग, मुंबई.
५) मांडे प्रभाकर (२००३) :भारतीय आदिवासी विकासाच्या समस्या, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद.
६) काळे बी.आर.(२००८): केंद्र व राज्यशासनाच्या आदिवासी विकास योजना, संदर्भ प्रकाशन, औरंगाबाद.
७) आदिवासी संशोधन पत्रिका(२०१०): महाराष्ट्र राज्य, पुणे.